# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४०४४ दिनांक : ०४/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. विभागप्रमुख/संचालक
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे–०७.

विषय — आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शुल्क घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम विद्यार्थ्यास तात्काळ परत करणेबाबत.

संदर्भ — या कार्यालयाचे पत्र क्र. २४१६ दि. १४/०७/२०१८, व ३४६६ दि.१०/०९/२०१८.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शासनाने ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना'' आणि शासनाच्या अखत्यारितील शिष्यवृत्तीच्या इतर योजनांसाठी पात्र असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले आहे अशा विद्यार्थ्यांना त्यातील ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम परत करण्याची कार्यवाही करण्याबाबत या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सर्व संबधिताना सूचना दिलेल्या आहेत. तथापी, अद्यापही या संदर्भात कार्यवाही होत नसल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहे.

तरी आपणांस पुनुश्य कळविण्यात येते की, जे विद्यार्थी वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत मात्र, त्यांच्याकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले असेल अशा विद्यार्थ्यांचे अर्ज व आवश्यक ते कागदपत्रे त्वरीत या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून संबंधित विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम परत करण्याबाबत उचित कार्यवाही करता येईल.

कळावे,

आपला,
(सही) ४/१०/२०१८
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
कार्यकारी सहायक मा. कुलसचिव यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे